मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ०१ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • जानेवारी - २०२३



# हसती दुनिया (मराठी)

अंक ०१ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • जानेवारी - २०२३

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
**राजेंद्र थोरात**
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
**स्वप्निल वि. न्हाटवळ**
**राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील**

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org



लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |


मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९









## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे १५
- आरोग्याचा मंत्र २४
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- सामान्य ज्ञान ४७
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- भ्रमंती २८
- तेजस्विनी ३२
- समर्थ दर्शन -भाग ९३ ३३
- विशेष ३५
- संतकथा ४२
- विशेष लेख ४४
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ४८





## कथा


- विदुराची कथा ०५
- सेवाभाव ०८
- ईश्वरसेवा २०
- आपली खरी ओळख २२
- निष्काम भक्त बोल्होबा ४५
- अनुभव आणि अनुमान ४९








## कविता


- आधार ईश्वराचा १२
- संदेश २०२२ चा २९

# चांगले तेवढे घ्यावे

## नूतन बर्षाच्या सर्वांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा

नवीन वर्षात पदार्पण करताना साहजिकच प्रत्येक जण नवीन संकल्प करतो. नव्या योजना आखतो. आपणही यावर्षी असाच एक संकल्प करूया... 'चांगले तेवढे घ्यावे.'

ग्रीस देशात सॉक्रेटिस नावाचे एक थोर विचारवंत होऊन गेले. एकदा त्यांच्याकडे त्यांचा एक चाहता आला. तो म्हणाला, महाशय, आज मी तुम्हाला तुमच्या मित्राविषयी एक महत्त्वाची गोष्ट सांगणार आहे. त्यावर सॉक्रेटिस पटकन म्हणाले, मित्रा, तू जे काही सांगणार आहेस ते शंभर टक्के सत्य आहे का? त्यावर तो गृहस्थ म्हणाला, तसं काही सांगता येणार नाही; पण सगळीकडे त्यांच्याविषयी तसं बोललं जातय, म्हणून तुम्हाला ते सांगायचं होतं.सॉक्रेटीसांनी पुन्हा विचारले, बरं तू जी गोष्ट सांगणार आहेस, ती चांगली आहे की वाईट आहे? त्यावर तो म्हणाला, तशी तर गोष्ट चांगली नाही, वाईटच आहे. सॉक्रेटीसांनी पुन्हा विचारलं, बरं ती गोष्ट माझ्या उपयोगाची तरी आहे की नाही? तो गृहस्थ म्हणाला, तसं तर ती गोष्ट तुमच्या उपयोगाची आहे असं नाही. त्यावर सॉक्रेटीस शांतपणे म्हणाले, मित्रा! तू जे काही सांगणार आहेस ते सत्य आहे की असत्य हे एकतर तुला ठाऊक नाही. तसेच जी गोष्ट सांगणार आहेस ती देखील अप्रिय आहे, शिवाय माझ्या उपयोगाचीही नाही. तर मग मला सांगून विनाकारण तुझा आणि माझा वेळ व्यर्थ का घालवत आहेस? शिवाय कुणाबद्दल काही अप्रिय गोष्टी सांगून तुला आणि मला निंदेचं पातक लागेल ते वेगळंच! त्यापेक्षा आपण चार हिताच्या गोष्टी बोलू या. चांगल्या विचारांचं, चांगल्या गुणांचं आदानप्रदान करु. त्याच्याने आपले सद्‌गुण वाढतील आणि जीवनात सकारात्मकताही येईल.

मित्रांनो, ज्याप्रमाणे आपण जुनं घर सोडून नवीन घरात प्रवेश करतो तेव्हा अनावश्यक वस्तू सोबत नेत नाही. तसे, आपणही नवीन वर्षात पदार्पण करताना नको त्या आठवणी, चुकीच्या सवयी सोडून जे जे उत्तम आणि उदात्त आहे ते ते घेत राहू . चांगल्या सवयी अंगी बाणवत जाऊ. सद्‌गुण धारण करु आणि सद्‌गुणच वाटत जाऊ. जेणेकरून आपणही आनंदाने जीवन जगू आणि इतरांनाही आनंद देत राहू.

- राजेंद्र थोरात •••



पौराणिक कथासार

# विदुराची कथा

हस्तिनापूरचा राजा विचित्रवीर्य यास पुत्रसंतान नव्हते. राज्याला वारस हवा म्हणून महर्षी व्यास यांना आमंत्रित करण्यात आले होते. महर्षींच्या तपःसामर्थ्याने व आशीर्वादाने महाराणींना पुत्र प्राप्ती व्हावी यासाठी त्यांनी दोन्ही राण्यांना आपल्या कक्षात बोलावले. महर्षी व्यासांचे तेजस्वी रूप व तपश्चर्येचा उग्रपणा पाहून मोठी महाराणी भयभीत झाली. तिने स्वतः पुढे जाण्याऐवजी आपल्या दासीला महर्षी व्यासांच्या कक्षात पाठवले. महर्षींच्या आशीर्वादाने त्या दासीला पुत्र झाला. त्याचे नाव ठेवले विदुर. हा पुत्र अतिशय बुद्धिमान, धार्मिक व सदाचरणी असेल असा आशीर्वाद महर्षींनी दिला. पुढे महर्षींच्या आशीर्वादाने धृतराष्ट्र आणि पंडू यांचा जन्म झाला.

विदुर कौरव–पांडवांचे काका आणि ज्येष्ठ कुरुपुत्र असूनही केवळ दासीपुत्र असल्याने त्यास राजगादीवर बसवण्यात आले नाही. धृतराष्ट्र हस्तिनापूरचा राजा

झाल्यानंतर विदुर राज्याचा महामंत्री म्हणून कार्यभार सांभाळू लागला. प्रत्येक वेळी तो धृतराष्ट्राला योग्य सल्ला देत असे; परंतु पुत्रमोहाने अंध झालेल्या धृतराष्ट्राने त्याचा सल्ला न मानता दुर्योधनाच्या दुष्कृत्याचे नेहमी समर्थन केले. त्यामुळे अनेकदा त्याला दु:खी व्हावे लागले. पांडवांवरील अन्याय, द्यूतक्रीडा, द्रौपदीचा अपमान आणि त्याचा परिणाम म्हणून झालेले महाभारताचे महाविनाशक युद्ध हे सारं धृतराष्ट्राच्या स्वार्थी आणि अविवेकी कृत्याचं फळ होतं. या सर्व गोष्टींचा सदाचरणी विदुराला वीट आला होता. महाभारताचं महाविनाशक युद्ध आपण पाहू शकत नाही असं सांगून त्याने श्रीकृष्णांची आज्ञा घेऊन हस्तिनापुर सोडून तीर्थयात्रेला निघून जाणे पसंत केले.

तीर्थयात्रेवरून परत येईपर्यंत महाभारताचं युद्ध संपलं होते. संपूर्ण कुरुसेनेचा आणि कौरवांचा नाश झालेला होता. पांडवांना त्यांचे राज्य प्राप्त झाले होते. परंतु दोन्ही पक्षांची अपरिमित हानी झाली होती. लाखो योद्धयांचे रक्त त्या भूमीवर सांडले होते. विदुर श्रीकृष्णाला विनंती करत म्हणाला,"हे केशव! माझ्या मृत्यूनंतर माझ्या देहाचं रूपांतर तुझ्या सुदर्शन चक्रामध्ये करावे. या अपवित्र भूमीवर माझा अंतिम संस्कार होऊ नये."

पांडवांची भेट झाल्यानंतर त्यांना आशीर्वाद देऊन विदुराने आपला देह सोडला. त्याचा आत्मा युधिष्ठिराच्या देहामध्ये विलीन झाला व मृतदेह सुदर्शन चक्रामध्ये सामावला गेला. हे पाहून युधिष्ठिर संभ्रमात पडला. त्याच्या प्रश्नाचे उत्तर देतांना भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "धर्मात्मा विदुर हा प्रत्यक्ष धर्मराजाचा अवतार होता आणि तूही धर्मराजाचा अंश आहेस म्हणून तो तुझ्यामध्ये विलीन झाला. विदुराच्याच इच्छेप्रमाणे त्याचा मृतदेह या रक्तरंजित भूमीवर न पडता सुदर्शन चक्रामध्ये समाविष्ट झाला. अशाप्रकारे विदुराने आपली भूमिका पार पाडत जीवन सार्थकी लावले."

विदुराचे राहणीमान अतिशय साधे होते. तो आपल्या छोट्याशा पर्णकुटीत राहत होता. जेव्हा श्री कृष्ण हस्तीनापुरी मुक्कामी होते तेव्हा दुर्योधनाकडचे पंचपक्वान्नाचे भोजन न स्वीकारता त्यांनी विदुराच्या घरी भक्तिभावाने केलेल्या कण्या सेवन केल्या. असा हा परमभक्त विदुर एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणून महाभारतात अजरामर झाला.

❖❖❖

## दिव्य वचन

जीवनाची सुंदरता देखील मनाच्या सुंदरतेवर अवलंबून असते. मन सुंदर असेल तर जीवनही सुंदर होऊन जाते. मनात ज्ञानाची ज्योत प्रकाशित झाली, की मन प्रकाशित होते. अंधकारातून प्रकाशात येण्याने मनात सुंदरता येते. सुंदरतेनेच इहलोक आणि परलोक सुंदर होऊ शकतो. ज्ञानज्योत (मनात) प्रकाशित झाल्याने प्रेम, दया, करुणेचा भाव निर्माण होतो.

-बाबा हरदेवसिंहजी महाराज

# नेताजी सुभाषचंद्र बोस



नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी,१८९७ रोजी ओरिसामधील कटक शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ आणि आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील प्रख्यात वकील होते. प्रथम ते सरकारी वकील होते. पुढे त्यांनी वकिली हा स्वतःचा व्यवसाय सुरु केला. काही काळ त्यांनी कटक महापालिकेत काम केले होते. तसेच ते बंगाल विधानसभेचे सदस्यही होते. इंग्रज सरकारने त्यांना रायबहादूर हा किताब दिला होता.

सुभाषचंद्रांचे प्राथमिक शिक्षण कटकमधील रॅवेन्शॉ कॉलिजिएट हायस्कूल मध्ये झाले. त्यावेळी त्यांना वेणीमाधवदास म्हणून शिक्षक होते. ते आपल्या विद्यार्थ्यांना देशभक्ती विषयीची प्रेरणा देत असत. वयाच्या १५ व्या वर्षी सुभाष गुरुच्या शोधात हिमालयात गेले; परंतु त्यांचा हा गुरुशोध असफल ठरला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून ते त्यांचे शिष्य बनले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत पास झाले; परंतु इंग्रज सरकारची नोकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले.

त्यानंतर त्यांनी कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्याबरोबर काम केले. रवींद्रनाथ ठाकूर यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यावर प्रथम ते मुंबईला आले आणि म. गांधीजींची भेट घेतली. तो दिवस होता २० जुलै १९२१. ही त्यांची पहिलीच भेट होती. गांधीजींनी त्यांना कोलकात्यात जाऊन दासबाबूंच्या बरोबर काम करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे ते कोलकात्यात गेले आणि दास बाबूंच्या बरोबर काम करु लागले.

१९२२ साली दासबाबूंनी स्वराज पक्षाची स्थापना करुन महापालिकेची निवडणूक लढवली व त्यात ते विजयी झाले आणि स्वतः कोलकात्याचे महापौर झाले व सुभाषबाबूंना मुख्य अधिकारी बनवले. त्यावेळी सुभाषबाबूंनी कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रजी नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली.

१९२८ साली काँग्रेसचे अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून पंडित मोतीलाल नेहरुंना सलाम केला आणि संपूर्ण इंग्रज सरकारजवळ संपूर्ण भारताच्या स्वराज्याची मागणी केली; परंतु ही मागणी इंग्रज सरकारने मान्य केली नाही.

१९३० साली लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन झाले. त्यात २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिवस म्हणून पाळला जाईल असे ठरले.

सुभाष बाबू ज्वलंत क्रांतिकारक असल्याचे समजल्यावरुन इंग्रज सरकारने त्यांना मंडाले येथील तुरुंगात ठेवले. तुरुंगात त्यांची तब्येत बिघडली. ती इतकी की कदाचित त्यांचा मृत्यू कारागृहात होईल या भितीने इंग्रजांनी त्यांना सोडून दिले. १९३२ साली त्यांना पुन्हा अलमोडा येथील कारागृहात ठेवले. पुन्हा कारागृहात त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांना युरोपला पाठविण्यात आले. युरोपला येऊन देखील ते

(पान ०९ वर)



# सेवाभाव

रामपाल नावाचा एक फळांचा विक्रेता होता. त्याच्या दुकानावर एक सधन कुटुंबातील महिला फळं घ्यायला आली. तिने रामपालला विचारले,“केळी कशी डझन दिली?” रामपाल म्हणाला, “पन्नास रुपये डझन.” “आणि सफरचंद?” “दोनशे रुपये किलो.” “बरं द्राक्षं कशी दिली?” “शंभर रुपये किलो”

तेवढ्यात एक गरीब दिसणारी महिला तिथे आली. ती थोडी घाई गडबडीतच होती. तिने रामपालला विचारले, “केळी कशी डझन ?” रामपाल म्हणाला, “पंचवीस रुपये डझन” “ आणि द्राक्षं?” “पन्नास रुपये किलो” ती महिला एक डझन केळी आणि अर्धा किलो द्राक्ष घेऊन लगेच निघूनही गेली.

हा सर्व प्रकार पाहून त्या सधन महिलेच्या तळपायाची आग मस्तकात गेली. क्रोधीत होत ती रामपालला म्हणाली, "काय रे, ती बाई तुझी कोण नातेवाईक आहे की फार मोठी लागून गेली?.. आणि किमतीमध्ये एवढा फरक कशासाठी? माणसं बघून तुम्ही कामं करता का रे? फळं स्वस्त असूनही आम्हाला दुप्पट भावाने विकता... खरं तर तुम्हाला पोलिसांच्या ताब्यातच द्यायला हवं."

त्यावर रामपाल शांतपणे म्हणाला, "ताई! माझं म्हणणं आधी पूर्णपणे ऐकून घ्या. ती महिला ना माझ्या नात्यातली आहे, ना ती कोणी मोठी व्यक्ती आहे. ती अतिशय परोपकारी आणि दयाळू आहे; परंतु अतिशय स्वाभिमानी आहे. परिस्थितीने गरीब असूनही तिला कोणाची मदत घेणे आवडत नाही. जेव्हा तिची मुलं आजारी होती तेव्हा तिला खूप वेळा मदत करण्याचा प्रयत्न केला; परंतु ती स्वाभिमानी बाई मदत घ्यायला नकार देत असे. त्यामुळे तिला मदत करण्याची संधी मी शोधत होतो. ती ज्या ज्या वेळी माझ्या दुकानात येते तेव्हा तेव्हा माझी विक्री देखील मोठ्या प्रमाणात होते. म्हणून मी तिच्यासाठी मुद्दामच कमी भाव लावतो. त्या निमित्ताने थोडीफार सेवा घडते." रामपालचा सेवाभाव व गरिबाविषयी असलेला कळवळा पाहून त्या सधन महिलेचा राग क्षणात निवळला. रामपालची क्षमा मागत ती म्हणाली, "खरंच भाऊ, तुझे खूप खूप आभार! तू मला सेवाभावनेची नवी दृष्टी दिलीस."

❖❖❖

# नेताजी सुभाषचंद्र बोस

(पान ०७ वरुन)


स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी क्रांतीवीर चळवळ चालूच ठेवली होती. तेथे त्यांना वीरुभाई पटेलांची साथ मिळाली.

१९३८ साली हिरापूर येथे काँग्रेसचे ५१ वे अधिवेशन होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष सुभाष बाबू होते. त्यावेळी सुभाष बाबूंचे स्वागत करण्यासाठी ५१ बैलांच्या रथातून त्यांची मिरवणूक काढली.

आपल्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत सुभाषबाबूंनी योजना आयोगाची स्थापना केली. त्या आयोगाचे पंडित जवाहरलाल नेहरु हे अध्यक्ष होते. बंगळुरु येथे वैज्ञानिक सर विश्वेश्वरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक विज्ञान परिषदही घेतली. १९३७ ला चीन जपानची लढाई झाली त्यावेळी सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखाली चिनी जनतेला सहाय्य करण्यासाठी डॉ. द्वारकानाथ कोटणीस ह्यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय पथक पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढे जेव्हा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी जपानची मदत मागितली तेव्हा त्यांना जपानचे हस्तक व फॅसिस्ट म्हटले गेले; परंतु वरील घटनेवरुन हे सिध्द होते, की सुभाषबाबू ना जपानचे हस्तक होते ना फॅसिस्ट विचारसरणीशी सहमत होते.

नेताजी सुभाषचंद्र बोस हे खरोखरच नावाप्रमाणे नेताजी होते. १८ ऑगस्ट १९४५ च्या दिवशी नेताजी सुभाषचंद्र बोस हे कसे व कुठे बेपत्ता झाले तसेच त्यांचे पुढे नक्की काय झाले हे कोणालाच कळू शकले नाही. त्यांच्यापुढील गूढ काहीही असो; परंतु आज देशाला अशा राष्ट्रप्रेमींची आवश्यकता आहे आणि ती कायमस्वरुपी त्यांच्याबरोबरच लोप पावली असे म्हणावे लागत आहे. हे राष्ट्रप्रेमी स्वातंत्र्यवीरांनो, तुम्हाला कोटी कोटी प्रणाम!

❖❖❖



## विचारपुष्प

# भक्ताची अवस्था

**सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

संत समागमासाठी संत–महापुरुषांनी खूप सेवा करून उत्तम व्यवस्था केलेली आहे. कारण इथे ज्या उत्तम भावना श्रवण करायला मिळतील, मग त्या विचार रुपात असतील किंवा गीत–कविता रूपामध्ये असतील त्या भावना, ते विचार ग्रहण करून आपण आपल्या जीवनात धारण करायचे आहेत. सत्संगाचं महत्त्व युगानुयुगे संत–महात्म्यांनी समजावलंच आहे. जेव्हा जीवन सेवा–सत्संग आणि नामस्मरण यावर

आधारित असतं तेव्हा ते जीवन भक्तिमय होऊन जातं. कारण ईश्वराची ओळख झालेली असते. सत्संग करत असताना क्षणोक्षणी जर या परमात्म्याची जाणीव मनामध्ये कायम असेल, तसेच सेवा देखील समर्पित भावनेने केली जात असेल, प्रत्येकाच्या भल्याचीच कामना त्यामध्ये असेल तर तो सत्संग, ती सेवा खऱ्या अर्थाने सार्थ ठरते. सेवेमध्ये निस्वार्थ भाव असावा, मग ती सेवा कुठेही लागलेली असो. मनात जेव्हा ईश्वराचा निवास असतो तेव्हा ते देखील स्मरणाचे स्वरूप असते. त्यावेळी मनात प्रत्येकाविषयी कृतज्ञेचा भाव जागृत होत असतो. क्षमाशीलतेचा भाव असतो. परमात्म्याने ही अत्यंत सुंदर सृष्टी निर्मिली आहे. विविध प्रकारचे ग्रह, तारे या धरतीवरील विशाल सागर, महाकाय पर्वत, विविध वनस्पती, पशुपक्षी या प्राकृतिक सौंदर्यात भिन्नता असूनही एकत्व आहे. ईश्वरनिर्मित प्रत्येक गोष्ट श्रेष्ठ असल्यामुळे तिरस्काराचा भाव नाही. गुरु–पीर–पैगंबर, संत–महात्मा यांनी नेहमी प्रेमाचीच शिकवण दिली. समदृष्टीने जगायला शिकवले. आपणही या विशाल प्रभूशी जोडून विशाल व्हायचं आहे. ज्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांचा अंगीकार करायचा आहे. कुठे दुर्गुण दिसला तरी तिरस्कार न करता प्रत्येकाचं भलं व्हावं, अशीच प्रार्थना करायची आहे. झाड जसं जीवनभर परोपकाराचं कार्य करतं. कोणी सुष्ट असो किंवा दुष्ट प्रत्येकाला सावली देतं, फळ देतं, ऑक्सिजन देतं. त्याला झाडाचे गुणधर्म शिकवावे लागत नाही; परंतु माणसाला मात्र 'मनुर्भव' म्हणजे माणूस बन असं का सांगितलं गेलं? कारण मनुष्य हा गैरसमज निर्माण करून स्वतःला श्रेष्ठ आणि इतरांना कनिष्ठ समजू लागला. या प्रभू परमात्म्याच्या निर्मितीमध्येच दोष दाखवत राहिला. त्यामुळे तो स्वतःदेखील शांत नाही आणि इतरांसाठी देखील अशांतीचं कारण बनला. सत्याची जाण झाल्यानंतरच मनुष्य खरा माणूस होत असतो. खरा भक्त बनतो. भक्त हा कुठेही विचारण करत असला, कोणत्याही स्थितीत असला, तरी तो भक्तच असतो. त्याच्यामध्ये कधीही अभिमान, अहंकार नसतो.

यावरून एक कहाणी आठवली. एका धनाढ्य व्यक्तीने खूप सारं धन गुरुदेवांना अर्पण केलं; परंतु गुरुदेवांनी मात्र त्या धनाकडे वळूनही बघितलं नाही. हे पाहून तो हैराण झाला.त्याला या गोष्टीचा रागही आला. शेवटी त्याला राहवलं नाही. त्याने विचारलं, की गुरुदेव आपल्याला एवढी धनसंपदा अर्पण केली; परंतु आपण त्याकडे साधं पाहिलंही नाही, असं का? त्यावर गुरुदेव म्हणाले, तू हे धन मला अर्पण केलेलंच आहे तर मग त्यासाठी एवढी आदळआपट, एवढा गाजावाजा का? एवढी आरडाओरड कशासाठी? ती धनाढ्य व्यक्ती विचार करू लागली, की मी तर काहीही बोललो नाही किंवा आवाजही केला नाही मग गुरुदेव असं का म्हणताहेत? त्यावर गुरुदेव त्याला समजावत म्हणाले, हा गाजावाजा, ही आदळआपट तुझ्या मनातली आहे. हा आवाज तुझ्या अभिमान–अहंकाराचा आहे. कारण भक्तीचा संबंध धनाशी नसून भावनेशी असतो. तुला आपल्या धनाच्या समर्पणाचा गर्व असेल तर ते धन स्वीकार्य होणार नाही. जेव्हा कर्ता भाव मनात येत नाही तेव्हाच ती सेवा समर्पित ठरते. भक्तीमध्ये समर्पित जीवन दिसून येतं; परंतु आपण मात्र या भक्तीमध्ये स्वतःच एक अडथळा होऊन राहतो.म्हणूनच एका शायराने म्हटलंय,

मै अपनी राह में खुद दीवार बनकर बैठा हूं
अगर वो आए भी तो
किस रास्ते से आयेगा

भक्त नेहमी कर्ता भावनेचा, अभिमानाचा अडथळा दूर सारून समर्पित जीवन जगत असतो.

❖❖❖

कविता

# आधार ईश्वराचा

– परशुराम कारंडे

माझ्या देखत एक प्रसंग घडला
भिंतीचा खिळा पाण्यात पडला
पाण्यात पडून तळाशी बुडला
हे पाहून मला एक प्रश्न पडला

लोखंडी जहाज पाण्यात बुडत नाही,
मग एवढासा खिळा तरंगत का नाही?
नंतर कळलं हा विज्ञानाचा चमत्कार आहे
यांत्रिक उपकरणांचा त्यामागे आधार आहे

प्रत्येक गोष्ट ही एकमेकांवर आधारित आहे
एक दुसऱ्याच्या सहकार्यावर निर्धारित आहे
या गोष्टीची जेव्हा प्रचिती आली
तेव्हा प्रत्यक्ष मी एक कृती केली

त्याच खिळ्याला लाकडाशी जोडलं
खिळ्यासह लाकूड पाण्यात सोडलं
तोच खिळा पाण्यावर तरंगू लागला
लाकडासह पाण्यावर फिरु लागला

माणूस देखील खिळ्यासमान हीन आहे
ईश्वराच्या आधाराविण दीन आहे
गुरुकृपेने ईश्वराचा जो आधार घेतो
तोच सर्व संकटातून सहज पार होतो.



# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

प्रश्न : संत महापुरुषांना मृत्यूची भीती का वाटत नाही?

उत्तर : जगामध्ये मृत्यू ही सर्वात भीतीदायक गोष्ट मानली जाते; परंतु संत–महापुरुष कधीही मृत्यूला घाबरत नाहीत. कारण त्यांना सद्गुरुने ज्ञान देऊन आधीच मुक्त केलेले असतं. देह नश्वर असून आत्मा शाश्वत आहे याची अनुभूती त्यांना झालेली असते. त्यामुळे ते कुठल्याही बाह्य शक्तीला न घाबरता सत्यावर दृढ राहतात.

प्रश्न : क्रियात्मक जीवन म्हणजे काय?

उत्तर : आपण जे ब्रह्मज्ञान प्राप्त केलेले आहे ते जीवनात धारण करून त्यानुसार जीवन जगणे म्हणजे क्रियात्मक जीवन. आपलं जीवन असं असावं, की कोणाच्याही मनात असा भाव येऊ नये, की या व्यक्तीपासून लवकर सुटका व्हावी. कोणीही म्हणावं, की ही व्यक्ती किती चांगली आहे. याच्या सहवासामध्ये खूप वेळ बसावं. जीवन याच्यासारखंच असावं; परंतु यासाठी आपल्या मनामध्ये कधीही अभिमान, अहंकार येऊ नये. कारण क्रियात्मक जीवनाचा प्रभाव हा शब्दांपेक्षा जास्त पडत असतो. यासाठी क्रियात्मक जीवन म्हणजेच स्वतःचं आचरण शुद्ध, पवित्र आणि सदाचारी असायला हवे. ज्ञानानुसार जीवन जगण्याचा अधिकाधिक प्रयत्न केला जावा.

प्रश्न : आपल्याला नित्यप्रति सत्संग करण्याची आवश्यकता का आहे?

उत्तर : आपलं जीवन सुखमय व्हावं, आपल्याला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, तृष्णा–कामना आपल्याला त्रास देऊ नयेत, त्यांच्यापासून बचाव करण्यासाठी सत्संग हा एकमात्र आधार आहे. जेव्हा आपण सत्संगात येतो तेव्हा सारं दुःख–कष्ट विसरून केवळ निराकार परमात्म्याचा आनंद प्राप्त करत असतो. सद्गुरुने जे प्रेम–प्रीत शिकवली आहे ती सत्संगाशी जोडून राहिल्याने कायम राहते. ब्रह्मज्ञान सद्गुरूच्या कृपेने प्राप्त होतं; परंतु त्यावर विश्वास मात्र सत्संगाने दृढ होत असतो .जस जसे, आपण सत्संग करतो तसतसं आपलं मन स्थिर होत जातं. शांत होतं. मनाला शक्ती मिळते. निराकार परमात्मा सर्वशक्तिमान असून कर्ता करविता आहे. सर्व सुखाचा दाता आहे. या गोष्टीची जाणीव होते.



# शब्दकोडे

# २१४

○ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ४ | |
| | ■ | ५ | | ■ | | ■ |
| ६ | ७ | | ■ | ८ | ■ | ९ |
| ■ | | ■ | १० | | ११ | |
| १२ | | | ■ | ■ | | ■ |
| ■ | | ■ | १३ | | | १४ |
| १५ | | | | ■ | ■ | |
| | ■ | ■ | १६ | | | |

## आडवे शब्द

१. प्रथम नोबेल पारितोषिक विजेती भारतीय महिला : मदर .......

३. कोणत्या राज्याची राजधानी दिसपुर आहे ?

५. अपयशाच्या विरुध्द शब्द

६. भारत रत्न पुरस्कार प्राप्त करणारा पहिला खेळाडू : ......... तेंडूलकर

१०. नेपाळ देशाची राजधानी

१२. अमेरिकेचे चलन

१३. दोनाचा चतुर्थघात अधिक तीनाचा वर्ग बरोबर किती ?

१५. महाभारतातील एक पात्र : जांबुवंत, बिभिषण, जरासंध, हनुमान

१६. समर्थ ........ स्वामी यांचा जन्म जांब येथे झाला.

## उभे शब्द

१. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म ....... जानेवारी, १८९७ रोजी झाला.

२. मुंबईतील मध्य रेल्वेचे एक स्थानक

४. नवऱ्याची आई

७. विदर्भाचे नंदनवन असे या ठिकाणाला म्हणतात.

८. मानव शरीराचा एक अंग

९. कारल्याची चव ......... असते.

११. पणजी शहर हे या नदीवर वसलेले आहे.

१३. संत निरंकारी मिशनचे वृत्तपत्र एक नजर हे दर ....... दिवसांनी प्रकाशित होते.

१४. ........ जानेवारी १९५० रोजी भारतात संविधान लागू झाले.

१५. संत नामदेवांची शिष्या : संत ........ बाई

उत्तरे इतरत्र



## वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : घाम आणि अश्रू यांच्या कार्यात नेमका फरक काय आहे ?**

**उत्तर :** घामात सामान्यत: प्रथिने नसतात. तथापि ज्यामुळे प्रथिने तयार होतात ती अमिनो आम्ले मात्र घामात असतात. घामात युरियाचे प्रमाण अश्रूंच्यापेक्षा दीड हजार पटीने जास्त आहे, पण घन पदार्थांचे प्रमाण अश्रूंच्या निम्मे आहे. सामान्यत: प्रतिव्यक्ती प्रतिदिनी सुमारे एक लिटर घाम गाळते, पण ते लक्षात येत नाही. घामाचे कार्य आहे त्वचेचे तापमान योग्य पातळीवर राखणे, तर अश्रूंचे कार्य डोळ्यांचे सतत संरक्षण करणे. अश्रूंमधील लायसोझाईम डोळ्यांवर येणाऱ्या जिवाणूंचा नाश करण्यासाठी उपयोगी असते. उन्हाळ्यात शरीराचे तापमान काही प्रमाणात वाढते. त्यावेळी जास्त घाम येऊन शरीराचे तापमान ३७ अंश सेल्सिअस एवढे राखले जाते. घाम आणि अश्रूंमार्फत शरीरात नको असलेले, जास्त झालेले पदार्थ बाहेर उत्सर्जित होतात. घाम आणि अश्रू यांच्या रासायनिक पृथ:करणात फरक आहे. पण दोन्हींमुळे उत्सर्जन क्रिया होत असते. सावज गिळल्यावर मगरीच्या, सुसरीच्या डोळ्यात अश्रू येतात. त्यानंतर त्यांच्या शरीरातील क्षारांचे प्रमाण खूप वाढते. ते अपायकारक असते. नक्राश्रू वाटे क्षारांचा निचरा होतो. कुत्र्याला घाम येत नाही. त्यांच्या जिभेवाटे घाम बाहेर पडतो.

**प्रश्न : कांगारु-कोआला सारखे प्राणी ऑस्ट्रेलिया आणि द.अमेरिका खंडातच का आढळतात ?**

**उत्तर :** कांगारु आणि कोआला या सस्तन प्राण्यांच्या पोटाजवळ पिशवी असते. या पिशवीत नुकतेच जन्माला आलेले पिलू मोठे होईपर्यंत राहते. कांगारुला एका वेळी एकच पिलू होते. जन्मत: ते खूप लहान असते. त्याची वाढ मातेच्या पोटाजवळील पिशवीतच होते. गवताळ प्रदेशात राहणारे कांगारु आणि झाडावर वस्ती करणारा कोआला हे निशाचर प्राणी आहेत. कोआला याचा ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या भाषेत 'पाणी न पिणारे' असा अर्थ होतो. कारण कोआलाला निलगिरीच्या पानातील पाणी पुरते.

गेली शंभर कोटी वर्षे दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया ही खंडे एखाद्या बेटासारखी इतर जगापासून वेगळी होती. अन्य भूभागापासून ऑस्ट्रेलिया जेव्हा विभक्त झाला तेव्हा त्या खंडावर राहणारे सस्तन प्राणी पोटाजवळ पिशवी असणारेच होते. उत्क्रांतीच्या ओघात त्यांच्यापासून इतर अनेक वेगवेगळे प्राणी तयार झाले.

एक कोटी वर्षांपूर्वी उत्तर अमेरिका खंडाला दक्षिण अमेरिका खंड जोडला गेला. त्यावेळी मात्र या प्राण्यांचा वेगवेगळ्या प्राण्यांशी संबंध आला. जगण्यासाठी त्यांना बराच संघर्ष करावा लागला. अनेक पिशवीधारक प्राणी निर्वंश झाले. ऑस्ट्रेलिया खंड म्हणजे एक विशाल बेट असून तेथे आजही प्रचंड संख्येने कांगारु आहेत. ऑस्ट्रेलियावर खरी मालकी कांगारुचीच आहे असे गमतीने म्हणायला हवे. कारण तेथील लोकसंख्या एक कोटी साठ लाख आहे आणि कांगारुंची संख्या एक कोटी ९० लाख आहे.



# आजोबा

चित्रांकन लेखन, रंग
अजय कालडा










झाडांना काळजी वाटू लागली.
आता काय करायचं आजोबा ?
तुम्ही काळजी करु नका. बिनादांड्याच्या कुऱ्हाडीने तो आपलं काहीच बिघडवू शकत नाही.
लाकूडतोड्याजवळ असलेल्या बिना दांड्याच्या कुऱ्हाडीने त्याने झाड तोडण्याचा भरपूर प्रयत्न केला परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही.
ओ हो... बिना दांड्याच्या कुऱ्हाडीचे घाव घालून मी तर फार थकून गेलो आहे. एवढी मोठी झाडं आता मी कशी तोडू ?
बघू या, एकटं लोखंड आपलं काय बिघडवतं ते ?


मी या कुऱ्हाडीने एवढं मोठं झाड तोडू शकत नाही; मला काहीतरी दुसरा उपाय शोधला पाहिजे.
आजोबा! तो पहा परत जात आहे. तुम्ही बरोबर म्हणाला होतात, की एकटा तो आपलं काहीच वाईट करु शकत नाही.
दुसऱ्या दिवशी लाकूडतोड्याला एक युक्ती सुचली.
जर मी या कुऱ्हाडीला दांडा घातला तर आपलं काम सोपं होईल.


आजोबा, तो पहा लाकूडतोड्या पुन्हा येत आहे.
त्याने त्याच्या कुऱ्हाडीला आता दांडा घातला आहे.
हो! आता आपण वाचू शकत नाही, कारण आपल्यातील एक दांडा त्याला फितूर झाला आहे.
अरे देवा! ह्या एका लाकडी दांड्याने आम्हा सर्वांना मारले.
लोखंडाच्या कुऱ्हाडीला जर लाकडी दांडा नसता तर झाड कापण्यापासून वाचले असते.
शेवटी झाडाचे एक लाकूडच झाडाचे वैरी बनले. जोपर्यंत लोखंडाला लाकडाची मदत मिळाली नाही तोपर्यंत कुऱ्हाड झाडाला तोडू शकली नाही. झाडाचा एक अंश लोखंडाला जाऊन मिळाला आणि अधोगती झाली. त्या लाकडाने 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' असे काम केले. आता झाडं कशी वाचणार ? अशाचप्रकारे आपल्या समाजाला व देशाला घरातीलच लोकांकडून अधिक धोका असतो.
तात्पर्य, फंदफितुरीनेच कुळाचा नाश होत असतो.



# ईश्वरसेवा

एकदा भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन फेरफटका मारत असताना त्यांना एक भिकारी भिक्षा मागताना दिसला. अर्जुनाला त्याची दया आली. त्याने त्याला एक अनमोल माणिक दिला. भिकारी खूश झाला. तो माणिक कुणी चोरू नये म्हणून घरी आल्यावर त्याने मडक्यात ठेवला. पहाटे त्याची पत्नी ते मडके घेऊन पाणी आणायला नदीवर गेली. मडके धुण्यासाठी ते पाण्यात बुडवले. त्याचवेळी तो माणिक पाण्यात पडून वाहून गेला; परंतु ते तिला कळलेच नाही. जेव्हा सकाळी भिकारी माणिक शोधायला गेला तेव्हा त्याची पत्नी म्हणाली, मडकं धुताना एक खडा त्यातून पडला आणि वाहून गेला. आपल्या नशिबाला दोष देत भिकारी पुन्हा भिक्षा मागायला उभा राहिला. दुसऱ्या दिवशी अर्जुनाने त्याला भिक्षा मागताना पाहून त्याची चौकशी केली. भिकाऱ्याने

घडलेली घटना सांगितली. अर्जुनाने यावेळी त्याला सुवर्णमुद्रांची थैली दिली. भिकारी खूश झाला; परंतु दुर्दैव असं, की रस्त्यातच चोराने ती थैली पळवली. तिसऱ्या दिवशी त्याच रस्त्याने जाताना जेव्हा भिकाऱ्याला भिक्षा मागताना पाहिलं तेव्हा अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला, हे केशव! या भिकाऱ्याला मी दोन वेळा मदत केली; परंतु दुर्दैव काही त्याची पाठ सोडत नाही. यावेळी भगवान श्रीकृष्णांना त्याची दया आली त्यांनी भिकाऱ्याला दोन नाणी दिली. ती घेऊन भिकारी खाण्याचे पदार्थ खरेदी करायला गेला. नदी किनारी एक कोळी जाळ्यात पकडलेला मासा विकायला उभा होता. त्या तडफडणाऱ्या माशाला पाहून भिकाऱ्याला दया आली. त्याने तो मासा दोन नाणी देऊन विकत घेतला आणि पाण्यात सोडून दिला.


माशाला पाण्यात सोडत असतानाच त्याच्या तोंडातून माणिक बाहेर पडला. मासा खोल पाण्यात निघून गेला. आपला हरवलेला माणिक पाहून भिकाऱ्याला अतिशय हर्ष झाला. आनंदाच्या भरात तो ओरडला, सापडला! सापडला!! भिकाऱ्याची सोन्याच्या नाण्यांची थैली पळवणारा चोर तिथंच होता. त्याला वाटलं भिकाऱ्याने आपल्याला ओळखले. आपली चोरी पकडली जाऊ नये म्हणून त्याने घाबरून ती सोन्याच्या नाण्यांची थैली भिकाऱ्याला देत तो पळून गेला. हे दृश्य पाहून अर्जुन म्हणाला, हे केशव! मी जेव्हा भिकाऱ्याला मदत केली तेव्हा त्याचं काहीच हित झालं नाही; परंतु तुझ्या दोन नाण्यांनी मात्र त्याचं कल्याण झालं, हे कसं?

त्यावेळी श्रीकृष्ण म्हणाले, भिकाऱ्याचं कल्याण माझ्या दोन नाण्यांमुळे झालं नाही तर त्याने केलेल्या परोपकारामुळे झालं. कारण त्याच्याकडे फक्त दोनच नाणी होती; परंतु त्याने आपल्या भुकेची पर्वा न करता निःस्वार्थपणे त्या माशाचं दुःख दूर केलं. जेव्हा मनुष्य स्वतःच्या सुखाची पर्वा न करता दुसऱ्याचं दुःख दूर करतो, तेव्हा एक प्रकारे तो ईश्वराचीच सेवा करत असतो. ईश्वर त्याला कुठल्याही गोष्टीची कमतरता पडू देत नाही.

म्हणूनच संत महात्मा नेहमी सेवेची प्रेरणा देत असतात.

❖❖❖





कथा

# आपली खरी ओळख

एकदा एका राजाच्या दरबारात एक तरुण नोकरी मागण्यासाठी आला. राजाने त्याला विचारले, तुझ्यामध्ये कोणता विशेष गुण आहे? कोणती कला तुझ्यामध्ये आहे? तरुण म्हणाला, मी कोणत्याही प्राण्याची वर्तणूक पाहून त्याच्याविषयी, त्याच्या जन्माविषयी सांगू शकतो.

राजा त्याला अश्वशाळेत घेऊन गेला. तिथे राजाचा आवडता घोडा बांधलेला होता. राजा म्हणाला, या घोड्याविषयी तू काय सांगू शकशील? तरुण म्हणाला, महाराज! मला दोन दिवसांचा अवधी द्या. राजा म्हणाला, ठीक आहे.

तरुणाने दोन दिवस घोड्याचे निरीक्षण करून सांगितले, हा घोडा गाईच्या दुधावर वाढलेला आहे. त्याला आपल्या मातेचं दूध मिळालेलं नाही. राजाने चौकशी केली असता घोड्याच्या मालकाने ही गोष्ट खरी असल्याचे सांगितले. तो म्हणाला, हा घोडा जन्माला आला त्याच वेळी त्याची माता मरण पावली. म्हणून त्याला गायीच्या दुधावर वाढवले. राजा तरुणाला म्हणाला, पण तू हे कसं ओळखलंस?

त्यावर तरुण म्हणाला, महाराज!घोडा गवत खाताना मान वर करुन खातो; परंतु हा घोडा गवत खाताना गाईगुरांसारखी मान खाली घालूनच गवत खातो. त्यावरून मी ओळखलं. राजा खूपच खूश झाला. त्याने तरुणाला खूप साऱ्या गाई, म्हशी, कोंबड्या बकऱ्या भेट दिल्या.

मध्ये काही दिवस गेल्यानंतर राजा एके दिवशी तरुणाला म्हणाला, आता माझ्याविषयी तू काय सांगू शकशील? त्यावर तरुण म्हणाला, महाराज! मला जर आपण अभयदान देणार असाल, शिक्षा करणार नाही असं वचन देणार असाल तरच मी तुमच्याविषयी सांगेन. राजा म्हणाला, ठीक आहे! तू जे सांगशील ते ऐकण्याची माझी तयारी आहे. मी तुला कुठलीही शिक्षा करणार नाही. त्यावर तरुण म्हणाला, महाराज! आपण ना राजे आहात, ना राजपुत्र म्हणून राजघराण्यात जन्माला आला आहात. हे ऐकताच राजा अतिशय क्रोधीत झाला; परंतु त्याने अभयदानाचे वचन दिलेले असल्यामुळे शांत बसला व म्हणाला, तू जे म्हणालास ते आता सिद्ध करून दाखव.

राजा तरुणाला घेऊन आपल्या मातेकडे गेला. त्याने मातेला विचारले, की मी राजपुत्र नाहीये का? त्यावर राजाची माता म्हणाली, होय! हा तरुण म्हणाला ते खरंय. तू आमचा पुत्र नाहीयेस. राज्याला वारस नसल्यामुळे एका गुराख्याच्या मुलाला आम्ही दत्तक घेतलं होतं. तो मुलगा तूच आहेस. त्यावर राजा आणखी आश्चर्यचकित होत तरुणाला म्हणाला, तू हे कसं ओळखलंस? त्यावर तरुण म्हणाला, महाराज! जेव्हा पहिल्यांदा तुम्हाला माझ्या कलेबद्दल खात्री पटली, तेव्हा तुम्ही मला बक्षीस म्हणून हीरे, मोती न देता गाई–म्हशी–बकऱ्या दिल्या. यावरूनच मी जाणलं, की तुम्ही खरे राजघराण्यातील नाहीत. कारण गाई, म्हशी, बकऱ्या भेट देणारा गुराखीच असू शकतो. आता मात्र राजा त्याच्यावर खूपच खूश झाला आणि त्याला आपल्या पदरी कायमचे ठेवून घेतले.

मित्रांनो, आपली खरी ओळख ही बाह्यरूपावरून ठरत नसते. सत्ता, संपत्ती, ऐश्वर्य, कीर्ती किंवा विविध कला कौशल्य या वरुन देखील आपली खरी ओळख होत नाही. आपली खरी ओळख ही आपल्या अंतरंगावरून, आपल्या गुणांवरून, आपल्या व्यवहारावरून, वागणुकीवरून, नीतिमत्तेवरुन ठरत असते.

खरं तर माणसाने आपली खरी ओळख करून घेण्यासाठी स्व–स्वरूपाचे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे.

❖❖❖



टी.व्ही. वर प्रत्येक मंगळवार व गुरुवार, सकाळी ७.०० ते ७.३० वाजेपर्यंत

सद्‌गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या

प्रवचनांचे प्रसारण

# पौष्टिक तत्त्वे आणि ऊर्जेने भरपूर बीट



☞ बीट मधुर, तुरट, शीतल व पचायला थोडे जड असते. यात फायबर्स, व्हिटॅमिन ए, बी, सी तसेच लोह, कॅल्शिअम, मॅंगनीझ, फॉस्फरस वगैरे खनिज तत्त्वे मुबलक प्रमाणात आढळून येतात. बीटाचे सॅलड व रसाच्या रुपात अथवा उकडून सेवन केले जाते. याचा रस पोषण, ऊर्जा, रोग-निवारण तसेच आरोग्य-संरक्षणाच्या दृष्टीने उत्तम आहे.

☞ बीट रक्त व रोगप्रतिरोधक शक्ती वाढविणारे आहे. हे हृदयाला मजबूत बनविते, यकृताला शक्ती देते आणि मेंदूला ताजेतवाने (फ्रेश) ठेवते. याचे फायबर्स जठर व आतड्यांची सफाई करतात. याच्या सेवनाने डोक्याची उष्णता व मानसिक कमजोरी दूर होते. बीट नैसर्गिक शर्करेचा चांगला स्त्रोत आहे.

☞ **रक्ताल्पता :** १-१ बीट व डाळिंब तसेच थोडी कोथिंबीर घेऊन यांचा रस काढून दिवसातून एकदा किंवा दोनदा घेतल्याने चमत्कारीक लाभ होतो.

☞ **मूळव्याध :** मूळव्याधीत जळजळ असेल तर ५० मि.ली. बिटाच्या रसात १ चमचा कोथिंबीरीचा रस मिसळून दिवसातून दोनदा प्यावे अथवा भोजनापूर्वी उकडलेले बीट कोथिंबीर टाकून खावे.

☞ **उच्च रक्तदाब :** उच्च रक्तदाबामुळे डोके जड वाटत असेल, उष्णता, अस्वस्थता वाटत असेल तर बीट व दुधीचा ५०-५० मि.ली. रस आणि १ चमचा मध मिसळून सकाळी रिकाम्या पोटी व सायंकाळी घेतल्याने लाभ होतो.

☞ **पचनक्रिया सुधारण्यात व पित्तजन्य रोगांमध्ये :** बिटाच्या एक कप रसात एक चमचा लिंबाचा रस मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते तसेच आम्लपित्त, उलटी, कावीळ इ. पित्तजन्य रोगांमध्ये लाभ होतो.

☞ **स्मरणशक्तीच्या विकासासाठी :** दिवसातून दोनदा बिटाचा रस प्यायल्याने स्मरणशक्तीचा विकास होतो.

☞ **दक्षता :** बीट पचायला जड असल्याने याचे अधिक सेवन करु नये. ज्यांची पचनशक्ती कमजोर असेल त्यांनी हे शिजवून खावे.





# ईश्वराला प्रिय तोच असतो...

इसा मसीहजी म्हणायचे, अंतकाळी अशाच लोकांचं कल्याण होईल, ज्यांनी मी तहानलेला असताना मला पाणी पाजलं. जेव्हा मी धडपडलो, तेव्हा मला हात देऊन उठवलं. तेच लोक माझ्या सर्वाधिक जवळ असतील. तेच ईश्वराला प्रिय असतील. ऐकणाऱ्यांना मोठं आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, आम्ही तर तुमच्याजवळ कधीही आलो नाहीत. तुमच्याशी आमचा प्रत्यक्ष संपर्क कधीही झालेला नाही आणि जगात जेवढी माणसं आहेत त्यांची तुमच्याशी भेट होणं हे देखील शक्य नाही. कारण शरीरालाही काही मर्यादा आहेत. प्रत्येक जण तुम्हाला कसे भेटू शकतील? आणि तुम्ही तहानलेले असताना सगळे धावत येऊन तुम्हाला पाणी कसे पाजू शकतील? हे तर शक्यच नाही. मग याचा अर्थ आम्ही सारे नरकाचे वाटेकरी ठरु. कारण आम्ही तुम्हाला पाणी पाजलेलं नाही. तुम्ही जेव्हा पडलात तेव्हा आम्ही तुम्हाला उठवलं नाही. म्हणजे आम्ही सगळे अधिकतर नरकाचे वाटेकरी ठरलो, नाही का?

हजरत येशुजी म्हणाले, हे मानवा! ही जेवढी माणसं आहेत ती माझीच रूपं आहेत. यातील एकाला जरी तू लाथाडलंस, तरी याचा सरळ अर्थ आहे, की तू मला लाथाडलंस. जर यातील एखाद्याला तू तहानेने तडफडून मारण्याचा प्रयत्न केला असशील तर तू मलाच मारण्याचा प्रयत्न केला आहेस.

मनुष्य ईश्वराला विसरून फक्त अवडंबर आणि देखावा करण्याचा प्रयत्न करतो; परंतु जो प्रभू–परमात्म्याला आपल्या मनात स्थान देतो, त्याच्यामध्ये भक्ताचे सारे गुण दिसू लागतात. प्रेम दिसू लागतं. तो कधीही दुसऱ्याचं वाईट करत नाही. प्रत्येकाला मदतीचा हात देतो. दुसऱ्याचे अश्रू पुसण्याचे काम करतो. तोच खऱ्या अर्थानं ईश्वराच्या सर्वात जवळ असतो.

❖❖❖





# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



ओवी सैद



सावी आरोटे



रुचिरा भागवत



संजवी धनावडे



इच्छा अवधूत



आस्था अवधूत



अशिता विश्वकर्मा



जिजा मेढेकर अवनीत मेढेकर



अन्वी उकार्डे



शुभम शिंदे



हिदान जाधव



साक्षात सोनुले



आरोही पांचाळ



मल्हार पंडुळे



श्रव्या पाटील



सुहानी लिंगे



अनय कारंडे



अवंतिका कुंभार



प्रचित पाटील



अवनित पदमे



आदिराज घाडगे



अमोल सावंत



अस्मित लवंदे



कैवल्य कुलकर्णी



नविता म्हात्रे



दिशा पाटील



क्रिया कामोठकर



साक्षी गजरे



सादिका उकार्डे



सावी खैरनार



सानवी पवार



विराज सावंत



संवेद पाटील



# जायकवाडी धरण

औरंगाबाद जिल्ह्यात पैठण तालुक्यातील जायकवाडी या गावात मोठे धरण बांधण्यात आले. हे आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण आहे. या धरणाची पायाभरणी १८ ऑक्टोबर १९६५ रोजी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या कार्यकाळात झाली. हे धरण आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण आहे. या धरणाचे उद्‌घाटन २४ फेब्रुवारी १९७६ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते करण्यात आले.

या धरणाची उंची ४१ मीटर असून लांबी अंदाजे दहा किलोमीटर आहे. या धरणाला २७ जलवाहिन्या आहेत. जायकवाडी धरणाला पैठण येथील महान संत संत एकनाथ महाराज यांच्या नावावरुन ‘नाथसागर धरण’ असेही म्हटले जाते.

गोदावरी आणि प्रवरा या नद्यांनी भरलेला हा जलाशय सुमारे ५५ किलोमीटर लांब आणि २७ किलोमीटर रुंद आहे. या जलाशयामुळे ३६ हजार हेक्टर क्षेत्र सिंचन होऊ शकते.

जायकवाडी हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. महाराष्ट्र राज्यातील दुष्काळी भागातील शेतीसाठी जमिनीला सिंचन करणे तसेच आसपासची शहरे, गावे आणि औरंगाबाद–जालना या नगरपालिका व औद्योगिक क्षेत्रांना पिण्यासाठी, वापरासाठी पाणी उपलब्ध करून घेणे हा उद्देश होता.

हे धरण साकारताना तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांना खूप संघर्ष करावा लागला होता. हे धरण औरंगाबाद पासून ५५ किलोमीटर अंतरावर आहे, तर पैठण पासून अवघ्या अडीच किलोमीटर अंतरावर आहे.

❖❖❖

# संदेश २०२२ चा

२०२२ साल म्हणालं, माझं तुम्हाला वंदन आहे
नववर्षाचं स्वागत करताय तुमचं अभिनंदन आहे

मागचं वर्ष असंच सरलं असं कधी म्हणू नका
चांगलं चुंगलं पुढे न्या भाव विपरीत आणू नका

गेल्या वर्षी सुध्दा तुम्ही चांगले संकल्प केले हो
वर्षाअखेर लक्षात आलं त्याचं काय झालं हो?

लाख संकल्प करण्यापेक्षा एकच संकल्प दृढ धरा
कोरोनात सुध्दा वाचलोय त्याचं तुम्ही सोनं करा

माझ्याकडे हे नाही... म्हणून कधी रडू नका
आहे त्याचा स्वीकार करा वळणावरती अडू नका

जीवन जगा सुंदर आहे फक्त दृष्टिकोन बदला
सुख आणि आनंदासाठी कोण म्हणतं फोन बदला?

संधी मिळाली सोनेरी सत्कर्माने ती सजवा हो
गुरुभक्तीची, मानवतेची मूल्ये खोलवर रुजवा हो

हर्षाचे अन् नववर्षाचे हेच खरे स्वागत आहे
२०२२ साल मला हळूच कानात सांगत आहे

– बाळकृष्ण कासार
खेड (रत्नागिरी)

**महाराष्ट्राचा ५६ वा प्रादेशिक वार्षिक संत समागम दिनांक २७, २८, २९ जानेवारी २०२३ रोजी बिडकीन, डी.एम.आय.सी मैदान, औरंगाबाद पैठण रोड, पैठण, औरंगाबाद येथे होत आहे.**



# हसा मुलांनो हसा



सूनबाई : सासुबाई, लाडूसाठी आणखी काजू हवेत.
सासुबाई : कशाला हवेत आणखी काजू? अगं लाडू करताना लाडूला काजू फक्त टोचावा आणि पुन्हा काढावा. खाणाऱ्याला वाटतं नेमका आपल्याच लाडूचा काजू गळून पडला असावा. अशा प्रकारे एकच काजू सर्व लाडूंना पुरतो.



पम्या : काका एक केळ कितीला दिलं?
केळेवाला : पाच रुपयाला.
पम्या : तीन रुपयाला देता का?
केळेवाला : अरे, तीन रुपयाला तर फक्त याचं साल येतं.
पम्या : मग असं करा, हे घ्या दोन रुपये, साल तुम्ही ठेवा आणि केळ मला द्या.



शिक्षक : बंड्या! अरे शाळेचा टाईम सातचा आहे आणि तू येतोस आठला, अभ्यास मागे पडतो ना!
बंड्या : सर! तुम्ही माझी वाट पाहत जाऊ नका. शिकवायला सुरुवात करत जा.



बाळूकाका : डॉक्टरसाहेब, काल रात्री माझ्या बायकोचा दात खूप दुखत होता. मी लगेच कापसाने तिचा दात साफ केला आणि लवंगाचं तेल कापसात भरुन दातात ठेवलं. नंतर पेनकिलर दिली. आता ती शांत झोपली. आता पुढे काय करु?
डॉक्टर : आता असं करा, मी आठ दिवस बाहेरगावी जातोय, तुम्ही माझं क्लिनिक सांभाळा.





बाई : दिवाळीला रांगोळीच्या आजुबाजूला पणत्या का लावतात?
बनी : रांगोळीला किनई थंडी वाजू नये म्हणून!



बाबा : यू नो बंटी, मी तुझ्या एवढा असताना क्लासमध्ये आउटस्टॅडींग स्टुडंट होतो.
बंटी : वॉव बाबा, यू आर ग्रेट!
बंटीची मम्मी : (किचन मधून) अरे बंटी! आउटस्टॅडींग म्हणजे त्यांना रोज वर्गाबाहेर उभं करायचे, शिक्षा म्हणून!



शहरातल्या मुलीचं लग्न एका खेडेगावात होते. सकाळी उठल्यावर सासू तिला म्हणाली सूनबाई म्हशीला चारा खायला घाल.
सून गोठ्यात गेली म्हशीच्या तोंडाला फेस पाहून ती परत आली व म्हणाली, सासूबाई, ती अजून ब्रश करतेय.



बायको पहिल्यांदाच कार चालवत असते. नवरा तिला फोन करुन विचारतो, "कुठे आहेस? आताच बातमी अलीय की, एक जण वन वे मध्ये उलट्या दिशेला गाडी नेतोय."
बायको : अहो, एक जण नाही. सगळेच उलट्या दिशेने चालवत आहेत.

## परमवीर चक्राच्या डिझाईनकार

# सावित्री खानोलकर



भारत देशाच्या रक्षणार्थ सदैव झटणाऱ्या सैनिकांसाठी परमवीर चक्र हे सर्वात मोठे मानचिन्ह आहे. ते पदक मिळवणे ही कोणत्याही सैनिकासाठी सर्वोच्च अभिमानाची गोष्ट आहे.

एखाद्या सैनिकाला हे परमवीर चक्र त्याने गाजवलेल्या शौर्याच्या आधारावर दिले जाते. पण तुम्हाला माहीत आहे का, परमवीर चक्राचं डिझाईन कोणी तयार केलंय ते? तर या प्रश्नाचं उत्तर ऐकून आपली छाती अभिमानाने फुलल्याशिवाय राहणार नाही. कारण परमवीर चक्राचं डिझाईन तयार करणारी स्त्री ही मराठी होती. नाव होतं सावित्री खानोलकर!

सावित्री खानोलकर या मूळच्या मराठी नव्हे. त्यांचा जन्म २० जुलै १९१३ रोजी स्वित्झर्लंडमध्ये एका हंगेरियन कुटुंबामध्ये झाला होता. त्यांचं मूळनाव इव्ह मॅनेये डे मारोस हे होते. वयाच्या १६ व्या वर्षी इव्ह यांची विक्रम खानोलकर यांच्याशी भेट झाली. विक्रम खानोलकर हे मराठी कुटुंबामध्ये जन्मले होते. ते भारतीय लष्करामध्ये एक मोठे अधिकारी होते आणि इंग्लंडमध्ये रॉयल मिलेटरीचे प्रशिक्षण घेत होते. पुढे काही भेटींमध्येच इव्ह आणि विक्रम यांचे संबंध जुळले. परंतु त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या लग्नाला परवानगी दिली नाही, कारण त्यांच्या वयामध्ये आणि संस्कृतीमध्ये खूप फरक होता. मात्र काही वर्षांनी १९३२ मध्ये इव्ह भारतामध्ये आल्या आणि त्यांनी विक्रम खानोलकर यांच्याशी विवाह केला. लग्नानंतर सावित्री खानोलकर हे मराठमोळं नाव त्यांनी धारण केलं.

त्या युरोपियन पार्श्वभूमीतून आलेल्या असूनही त्यांनी भारतीय संस्कृतीशी जुळवून घेतलं. त्यांनी शाकाहार आत्मसात केला, हिंदू प्रथा त्या पाळू लागल्या. लोकसाहित्य, नृत्य, चित्रकला आणि संगीत यांसारख्या शास्त्रीय कलांमध्ये त्यांनी नैपुण्य मिळवलं. एवढंच नाही, तर त्या अस्खलित हिंदी, मराठी आणि संस्कृत भाषाही बोलू लागल्या. हिंदू पौराणिक ग्रंथांचे आणि भारताच्या इतिहासाचे त्यांनी

(पान ३४ वर)



समर्थ दर्शन : भाग - १३

# समर्थांचे निर्वाण

२४ मार्च १६०८ रोजी जालना जिल्ह्यातील जांब येथे जन्मलेले नारायण सूर्याजी ठोसर उर्फ समर्थ रामदास स्वामी हे परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांचा प्रसार करणारे तसेच राजकारण हे धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे एकमेव महाराष्ट्रीयन संत होते. त्यांनी आपले कार्य संपन्न करून १३ जानेवारी १६८१ रोजी सातारा जिल्ह्यातील सज्जनगडावर समाधी घेतली.

समर्थांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते. गौरवर्ण, तेजस्वी कांती, कपाळावर लहानसे टेंगूळ, कमरेस लंगोटी, पायात खडावा, लांब दाढी, जटा, हातात कुबडी, काखेत झोळी अशी ही मूर्ती 'शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे' असे त्यांचे वर्णन केले आहे.

बालपणी अत्यंत खोडकर असलेल्या नारायणाचं लग्न करून दिल्यावर त्याचं मन संसारात रमेल अशी त्यांच्या आईला आशा

वाटत होती. बाराव्या वर्षी नारायणाच्या लग्नाचा घाट घातला. बोहल्यावर उभे असताना 'सावधान' हा शब्द ऐकताच त्यांनी धूम ठोकली. नाशिकच्या पंचवटी भागात वास्तव्य केले. आपले नाव बदलून रामदास हे नाव धारण केले. नाशिक जवळील टाकळी भागात उपासना केली. गोदावरीच्या पात्रात उभे राहून 'श्रीराम जयराम जय जय राम' या नामाचा तेरा कोटी जप पूर्ण केला. रोज बाराशे सूर्यनमस्कार घालून शरीराचा आणि मनाचा विकास केला. रोज फक्त पाच घरी भिक्षा मागून खात. उरलेलं अन्न पशुपक्ष्यांना खाऊ घालत.

सज्जनगडावर देह ठेवण्यापूर्वी पंधरा दिवस आधी त्यांनी आपल्या शिष्यांना याची पूर्वकल्पना दिली होती. माघ वद्य नवमीला समर्थांनी तीनदा मोठ्याने राम नामाचा उच्चार केला आणि देह ठेवला. तेव्हापासून माघ वद्य नवमीला 'दासनवमी' असे म्हटले जाते.

समर्थांच्या या निर्वाणदिनी स्वतः छत्रपती संभाजी राजे देखील जातीने हजर होते. समर्थ रामदास स्वामींची समाधी सज्जनगडावर असून आजही त्यांच्या नित्याच्या वापरातील अनेक वस्तू देखील तेथे पाहावयास मिळतात.

'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' किंवा 'यत्न तो देव जाणावा' अशी कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या समर्थांनी संभाजी राजांनाही 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' असा उपदेश केला.

............ समर्थ दर्शन—समाप्त

परमवीर चक्राच्या डिझाईनकार

# सावित्री खानोलकर

(पान ३२ वरुन)

सखोल ज्ञान घेतलं. परमवीर चक्र बनवणाऱ्या मेजर जनरल हिरालाल अटल यांनी सावित्री खानोलकर यांचं हेच ज्ञान लक्षात घेऊन त्यांना परमवीर चक्राचं डिझाईन बनवण्यास सांगितलं. त्यानुसार त्यांनी हिंदू पुराणातील ऋषी दधीची यांच्या कथेपासून प्रेरणा घेऊन मेडलचे डिजाईन तयार केले. ऋषी दधीची यांनी इंद्राला वज्र नावाचं कठीण शस्त्र निर्माण करण्यासाठी आपल्या अस्थींचं दान केलं होतं.


सावित्री यांनी बनविलेल्या डिझाईनमध्ये पदकाला जोडण्यासाठी एक जांभळी रिबीन आहे आणि पदकावर इंद्र वज्राच्या चार प्रतिकृती आहेत, त्या ऋषी दधीची यांनी केलेल्या समर्पणाचे प्रतीक आहेत आणि मध्यभागी अशोकस्तंभ आहे. योगायोगाने त्यांनी डिजाईन केलेले प्रथम परमवीरचक्र त्यांचा जावई मेजर सोमनाथ शर्मा यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आलं. पायलटचा परवाना मिळवणाऱ्या सावित्री खानोलकर या पहिल्या भारतीय महिल्या होत्या. जालंधरच्या उत्तर भारतीय फ्लायिंग क्लबमधून त्यांनी हा परवाना मिळवला होता. १९५२ मध्ये त्यांचे पती विक्रम खानोलकर यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी समाज कार्यात आपले लक्ष केंद्रित केले. १९९० पर्यंत त्यांचा हा समाजकार्याचा वसा चालूच राहिला.



# नोबेल पारितोषिक



## नोबेल पुरस्कार मिळवणारे भारतीय –



### १. रवींद्रनाथ टागोर (१९१३)

१९१३ मध्ये नोबेल पुरस्कार मिळवणारे रवींद्रनाथ टागोर हे पहिले भारतीय नागरिक तथा प्रथम आशियाई व्यक्ती होते. कवी, साहित्यिक आणि राष्ट्रगीत 'जन गन मन' लिहिणारे रवींद्रनाथ टागोर यांना साहित्य क्षेत्रातील नोबेल पुरस्काराने (गीतांजली करीता) सन्मानित करण्यात आलं आहे.

### २. सी व्ही रमन (१९३०)

रवींद्रनाथ टागोर यांच्यानंतर तब्बल १७ वर्षांनी सी व्ही रमन यांच्या रुपाने भारताला नोबेल पारितोषिक मिळालं. भौतकशास्त्रातील कामगिरीबद्दल सी व्ही रमन यांना नोबेल पुरस्कार मिळाला होता. प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग संशोधनासाठी त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार मिळाला.





### ३. मदर टेरेसा (१९७९)

मिशनरीज ऑफ चॅरिटीची स्थापना करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आणि रोमन कॅथलिक नन मदर टेरेसा यांना १९७९ मध्ये शांतीचं नोबेल पारितोषिक देण्यात आलं होतं.

### ४. अमर्त्य सेन (१९९८)

अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्राची दिशा यामधील प्रयत्नांसाठी त्यांना १९९८ साली नोबेल पुरस्काराने गौरव करण्यात आला.





### ५. कैलास सत्यर्थी (२०१४)

बाल अधिकारांसाठी काम करणारे आणि बचपन बचाओ आंदोलनचे संस्थापक कैलास सत्यार्थी यांचा शांततेसाठीच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. सत्यार्थी यांच्यासोबत पाकिस्तानची बाल अधिकार कार्यकर्ता मलाला युसूफजई यांचाही नोबेल पुरस्काराने गौरव करण्यात आला होता.

## नोबेल पुरस्कार मिळवणारे भारतीय वंशाचे व्यक्ती

### १. हरगोविंद खुराना (१९६८)




भारतीय जैव–रसायनशास्त्रज्ञ. हरगोविंद खुराना हे भारतात जन्मलेले शास्त्रज्ञ आहेत. जनुकीय रचना व प्रथिनांच्या रचनेमधील त्यांचा महत्वाची कडी शोधण्याच्या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल यांना रॉबर्ट डब्ल्यू. हॉली आणि मार्शल वॉरेन निरेनबर्ग यांच्या सोबत १९६८ चे वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले होते.



### २. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर (१९८३)

हे एक भारतीय वंशाचे अमेरिकन शास्त्रज्ञ होते. आधुनिक खगोलशास्त्रात त्यांचे काम मुलभूत आणि महत्त्वाचे मानले जाते. ताऱ्यांची उत्पत्ती कशी होते ते चंद्रशेखरांनी शोधून काढले. या कामासाठी त्यांना १९८३ चे नोबेल पारितोषिक मिळाले. शिवाय त्यांना पद्मविभूषण, ब्रुस पदक, व इतर अनेक पारितोषिके मिळाली. विश्व प्रसिद्ध वैज्ञानिक सर सी. व्ही. रामन (१९३० चे नोबेल विजेते) हे सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचे काका होते.

### ३. वेंकटरामन रामकृष्णन (२००९)



वेंकटरामन रामकृष्णन हे केंब्रिज, इंग्लंड येथील एका प्रयोगशाळेत काम करणारे भारतीय वंशाचे अमेरिकन शास्त्रज्ञ आहेत. रामकृष्णन ह्यांना इतर दोन शास्त्रज्ञांसोबत २००९ सालचे रसायनशास्त्रातील नोबेल राईबोसोम, मॅक्रोमोलेक्युलर क्रिस्टलोग्राफीच्या रचना आणि कार्यासाठी मिळाले आहे.

### ४. अभिजित विनायक बॅनर्जी (२०१९)



भारतीय वंशाचे अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ आहेत. अभिजित यांना इस्टर ड्युफ्लो आणि मायकेल क्रेमर यांच्यासमवेत आर्थिक विज्ञानातील २०१९ चे नोबेल मेमोरियल पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांना हे पारितोषिक जागतिक दारिद्र्य दूर करण्याच्या त्यांच्या प्रायोगिक दृष्टिकोनासाठी देण्यात आले.

## नोबेल पुरस्कार मिळवणारे विदेशी वंशाचे पण जन्माने भारतीय आणि भारतातील रहिवासी असलेले

### १. रोनाल्ड रॉस (१९०२)




रोनाल्ड रॉस हे भारतात जन्मलेले ब्रिटीश वंशीय डॉक्टर होते. भारतातील वास्तव्यात त्यांनी मलेरियावर महत्त्वपूर्ण संशोधन केले. या कामगिरीसाठी त्यांना १९०२ मध्ये नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.



### २. रुडयार्ड किप्लिंग (१९०७)

रुडयार्ड किप्लिंगचा जन्म भारतात मुंबई येथे झाला. त्यांनी अनेक साहित्यकृती निर्माण केल्या. हे इंग्रजी लेखक व कवी होते. त्यांना १९०७ चे साहित्याचे नोबेल पारितोषिक प्राप्त झाले होते.

### ३. १४ वे दलाई लामा (१९८९)



या दलाई लामांनी तिबेटी लोकांच्या हितरक्षणासाठी हयातभर कार्य केले असून इ.स. १९८९ साली त्यांना शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. सध्या भारतात , हिमाचल प्रदेशातील धरमशालात दलाई लामा वास्तव्यास आहेत. चीनच्या वाढत्या जाचामुळे व अत्याचारामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव दलाई लामांना त्याच्या कुटुंबीयांसह इ.स. १९५९ मध्ये तिबेट सोडावे लागले. ते भारतात शरण आले. येथे त्यांनी लोकशाही मूल्यांच्या तत्त्वावर तिबेटीय निर्वासितांची संसद स्थापन केली आहे. आज ही संसद किंवा निर्वासितांचे सरकार दलाई लामांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहे. तिबेटी बौद्ध मतातील गेलुग्पा पंथाच्या प्रमुख आचार्यांना दलाई लामा अश्या संज्ञेने उल्लेखले जाते. १७ नोव्हेंबर, इ.स. १९५७ रोजी चौदाव्या दलाई लामांनी पदाची सूत्रे हाती घेतली.

❖❖❖



# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




मॅडम, लाकडाच्या चाकाचा शोध कधी लागला ?
लाकडी चाकाचा सर्वप्रथम शोध मेसोपोटामिया (पश्चिम आशिया) येथे लागला. इ.स. पूर्व ३५०० वर्षे अगोदर लाकडाचे तुकडे जोडून चाक बनविले जात असे.
मॅडम, मग याच्यात सुधारणा होऊन कसकशी प्रगती झाली. कृपया सांगा ना.
लाकडी चाकाचा विकास समयानुसार अनेक प्रकारे झाला.
प्राचीन काळी जास्त वजनदार वस्तू घेऊन जाण्यासाठी लाकडी रोलर बनविले जात असत व ते त्या वस्तूच्या खाली ठेवून त्यांच्यावरुन वस्तू सहज ढकलत घेऊन जात असत.
हो, मॅडम!


त्यावेळच्या लोकांनी वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी स्लेजचा शोध लावला.
पण मॅडम, स्लेज तर बर्फाळ प्रदेशात चालते.
त्या स्लेजना रोलरवर बसून चालवण्याचा प्रयास केला गेला.
मॅडम या चाकाचा शोध तर फार मजेदार आहे.
त्याच्यानंतर स्लेजच्या खाली रोलरचा उपयोग चाकाप्रमाणे होऊ लागला. त्यानंतर रोलरवर एक मोठी खाच पाडून त्यात स्लेज अडकवून स्लेजला अधिक दूर घेऊन जाणे सोपे झाले.


अशाप्रकारे रोलरला चाकाचा आकार दिला गेला.
त्यानंतर लाकडी चाक लावून सर्वात प्रथम लाकडी गाडी तयार झाली.
इ.स.२००० पूर्व ही चाकं रथ आणि बैलगाड्यांना लावली गेली. त्यानंतर ह्या चाकांमध्ये विकास होत गेला. त्याचा परिणाम आज आपण पाहतच आहोत.
हो मॅडम! ट्रक, बसेस आणि रेल्वेगाडी देखील चाकावरुनच चालतात.
पाहिलंत मुलांनो! या चाकाचा शोध आज आपल्या किती कामाला येत आहे.
हो मॅडम!
मुलांनो! मानवाच्या विकासामध्ये चाकांचे फार महत्त्व आहे.

# संत भानुदास

संत भानुदास यांचा जन्म इ.स.१४४८ मध्ये पैठण येथे एका ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात झाला. वयाच्या दहाव्या वर्षी ते एका गुहेत जाऊन सूर्याची उपासना करू लागले. सतत सात दिवस अन्नपाणी न घेता सूर्यनारायणाची उपासना करत होते. भगवान सूर्यनारायण प्रकट झाले आणि त्यांना आशीर्वाद दिला.



भानुदास पुढे तिथेच राहू लागले. त्यांचे आई–वडील त्यांच्यासाठी व्याकूळ झाले होते. पण कोणाकडून तरी कळले की ते गुहेमधील मंदिरामध्ये सूर्यनारायणाची उपासना करत आहेत. हे कळल्यावर आई वडील त्यांना घ्यायला गेले. जेव्हा त्यांनी विचारले, “बाळा, तुला इथं जेवण कोण देत होतं?” तेव्हा ते म्हणाले, “एक ब्राह्मण मला रोज दूध आणून देत होता.” आई वडिलांनी त्यांना घरी नेले. पुढे त्यांचा विवाह करून दिला. उपजीविकेसाठी कपड्याचा धंदा सुरू करून दिला. त्यांचा धंदा चांगला चालू लागला. ते पाहून इतर कापड व्यापारी त्यांचा द्वेष करू लागले. एके दिवशी व्यापाराच्या निमित्ताने ते काही व्यापाऱ्यांबरोबर दुसऱ्या शहरात गेले होते. रात्री धर्मशाळेत मुक्कामास असताना ते गावातील कीर्तनाला गेले. ते पाहून दुष्ट व्यापाऱ्यांनी त्यांचा घोडा सोडून दिला व त्यांचे कापड्यांचे गाठोडे लपवून ठेवले.

परंतु पांडुरंगाने ब्राह्मणाचे रूप घेऊन त्यांचा घोडा अडवून ठेवला. तिकडे धर्मशाळेमध्ये चोरांनी व्यापाऱ्यांचे कपड्यांचे गाठोडे चोरुन नेले. भानुदास कीर्तन संपल्यावर धर्मशाळेत परतले तेव्हा ब्राह्मणाच्या रुपात आलेल्या पांडुरंगाने त्यांना घोडा व त्यांचे कपड्याचे गाठोडे त्यांच्या हवाली केले. इकडे व्यापाऱ्यांना झालेली शिक्षा पाहून भानुदासांना दया आली तसेच आपल्यासाठी पांडुरंगाला त्रास झाला म्हणून दुःखही झाले. त्यांनी आपल्या जवळचे कपड्यांचे गाठोडे व्यापाऱ्यांना देऊन टाकले. त्यांना सन्मार्गावर आणले.

एकदा विजयनगरचा राजा कृष्णदेवराय पंढरपूरला आला असताना पांडुरंगाच्या दर्शनाने भारावून गेला. त्याने पाहिले की पंढरपुरात पांडुरंगाची बडदास्त नीट ठेवली जात नाही, म्हणून आपल्या सेवकांकडून पांडुरंगाची मूर्ती विजयनगरला नेली. येथे भव्य मंदिरामध्ये पांडुरंगाची स्थापना करून रोज पूजाअर्चा करू लागला. तिकडे आषाढी एकादशी जवळ येऊ लागली तशी पंढरीच्या वारीला जाणाऱ्या भक्तांची रीघ लागली; परंतु पंढरपुरात पांडुरंगाची मूर्ती नाही हे पाहून त्यांचा हिरमोड झाला. ही वार्ता सगळीकडे पसरली. आषाढी एकादशीला पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लांबून लांबून भक्त वारी बरोबर येत असतात. त्यांना पांडुरंगाचं दर्शन होणार नाही हे पाहून भानुदासांनी पांडुरंगाची मूर्ती पंढरपूरला घेऊन येण्याचा निश्चय केला. ते विजयनगरला गेले. तिथे मंदिराभोवती कडक पहारा होता. राजा कृष्णदेवराय पूजा आटोपून परतल्यावर मंदिराला कुलूप लावण्यात आले. रात्री सामसूम झाल्यावर भानुदास मंदिराजवळ आले. पांडुरंगाला कळवळून प्रार्थना केली,"देवा! मी तुला घ्यायला आलोय. एवढ्या बंदोबस्तामध्ये मी तुझं दर्शन कसं घेऊ?" त्याचवेळी पहारेकरी झोपले. दरवाजे आपोआप उघडले. भानुदासांनी पांडुरंगाच्या चरणी मस्तक ठेवले आणि पांडुरंगाला आपल्या सोबत येण्याची विनंती केली. पांडुरंग काही न बोलता फक्त हसले व स्वतःच्या गळ्यातील रत्नजडित हार आपल्या भक्ताच्या गळ्यात घातला आणि आपण नक्की येऊ असे आश्वासन दिले.

भानुदास मंदिराबाहेर येताच कडीकुलुपं आपोआप बंद झाली. पहाटे जेव्हा राजा कृष्णदेवराय मंदिरात पूजेसाठी आला तेव्हा त्याला पांडुरंगाच्या गळ्यातील रत्नजडित हार गायब झालेला दिसला. त्याने त्वरित हाराचा शोध घ्यायला सैनिक पाठवले. त्याच वेळी तुंगभद्रा नदीत भानुदास स्नान करत होते. सैनिकांनी त्यांच्या गळ्यात रत्नजडित हार बघताच त्यांना पकडून राजापुढे हजर केले. राजाने त्यांना सुळावर देण्याचा आदेश दिला. जेव्हा त्यांना सुळावर चढविण्यात आले तेव्हा ते म्हणाले, "पांडुरंगा, तुला न्यायला आलो त्याची ही शिक्षा आहे का?" तेवढ्यात सुळाला पालवी फुटली. सुळाचे वृक्षात रुपांतर झाले.फुलं पडू लागली. हे पाहून राजा कृष्णदेवरायाने त्यांचे पाय धरले. त्यांची क्षमा मागितली. भानुदास यांचा भक्तीतील अधिकार पाहून त्यांनी त्यांची पालखीतून मिरवणूक काढली व पांडुरंगाला वाजत गाजत नेण्याची परवानगी दिली.

अशा पद्धतीने भगवंत आपल्या भक्ताची कीर्ती वाढवत असतो. पांडुरंगाला पंढरपुरात आणण्याचं महान कार्य या भगवद्भक्ताने केलं.

संत भानुदास हे संत एकनाथ यांचे पणजोबा होत. इसवी सन १५०६ मध्ये त्यांनी समाधी घेतली. पंढरपुरात विठ्ठलाच्या मंदिराच्या प्रवेश द्वाराजवळच त्यांची समाधी बांधण्यात आली आहे.

# संत समागम... फक्त शिकण्यासाठी

महाराष्ट्राचा प्रादेशिक संत समागम या महिन्यात संपन्न होत आहे, यावरुन एक प्रसंग डोळ्यासमोर आला आणि मनात प्रश्न उभा राहिला, की संत समागम कशासाठी आयोजित केला जातो?का जायचं संत समागमाला?

अलीकडेच समालखा येथे आयोजित केलेल्या ७५व्या संत निरंकारी समागमाला जाण्याचा योग आला, तेव्हा समजलं. संत समागमाला जायचं ते फक्त शिकण्यासाठी...!! समालखाच्या मैदानातील भव्य निरंकारी प्रदर्शनी पाहता पाहता. बाल प्रदर्शनी पाहण्याचा योग आला. त्यामधे बालसंतांनी "जिंदगी एक जंक्शन हैं" ही एक नाटिका सादर केली होती.रेल्वे स्टेशनमध्ये घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगांना त्यांनी मानवी जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न केला होता. त्या मध्ये अनेक छोटे–मोठे प्रसंग दाखवले. एक प्रसंग असा होता. एक जोडपे असते. त्यांना प्रवास करायचा होता. त्यातील स्त्रीने प्रवासाला लागणारे सर्व सामान तर घेतले होतेच; पण ज्याची आवश्यकता नव्हती असेही बरेचसे सामान सोबत घेतले. प्रवास करताना त्यांना बराच त्रास सहन करावा लागला. त्यांना तर त्रास झालाच, पण इतर प्रवाशांना सुध्दा त्याचा त्रास झाला. पती महाशय पत्नीला म्हणतात, तुला सांगत होतो ना, जेवढं सामान आवश्यक आहे तेवढंच घे म्हणून! मग कशाला झाला असता एवढा त्रास?

जीवन सुध्दा एक प्रवासच आहे. या अल्पशा जीवनप्रवासात आपण केवढा तरी भार डोक्यावर घेऊन जगत असतो! ज्याची आवश्यकता आहे तेही आणि आवश्यक नाही तेही! तो भार कुठल्या पद–प्रतिष्ठेचा असेल किंवा भौतिक साधनसुविधांचा असेल, संपत्तीचा असेल किंवा दिखाऊपणाचा असेल! मग कसा होणार आपला जीवन प्रवास सुखाचा?

संत समागम संपवून आम्ही निजामुद्दीन स्टेशनवर येण्यासाठी बसने निघालो.आमच्यासोबत असलेल्या एका व्यक्तीकडे ३–४ बॅगा होत्या. क्षणभर वाटलं, की माणसासाठी सामान आहे की सामानासाठी माणसं आहेत?

खरा किस्सा असा झाला, जेव्हा बस रेल्वे स्टेशनजवळ आली तेव्हा बस चालक म्हणाला,"बस आगे नही जायेगी. आप सबको यहीं उतरना होगा." रेल्वे स्टेशन किती दूर आहे हे विचारलं असता समजलं, की ते आठ–नऊशे मीटर अंतरावर आहे. म्हणजे किमान १५–२० मिनिटं तरी चालावं लागेल. थोडी तूतू मैमै पण झाली, पण बसचालक मात्र आपल्या निर्णयावर ठाम होता.

तेवढ्यात एकजण म्हणाला, काही इलाजच नसेल तर आपण इथंच उतरु या. त्यावर समोरची व्यक्ती म्हणली, "तुम्हाला काय जातंय बोलायला! तुमच्याकडे एकच

(पान ४६ वर)



कथा

# निष्काम भक्त बोल्होबा

संत तुकाराम महाराजांचे वडील बोल्होबा आंबिले सावकारी करत होते. परंतु ते पांडुरंगाचे निस्सीम भक्त देखील होते. दर वर्षी न चुकता पंढरपूरची वारी करत. नित्यनेमाने संतसेवा करत; परंतु पांडुरंगाकडे कधी त्यांनी काही मागितले नाही. एके दिवशी त्यांची पत्नी कणकाई म्हणाली, मलाही पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला घेऊन चला पण त्यांनी तिला आपल्या सोबत नेले नाही. असे अनेक वेळा सांगूनही बोल्होबांनी तिला नेले नाही. कारण त्यांना मूलबाळ नसल्याने कणकाई दुःखी होत्या. बोल्होबा निष्काम भक्त असल्याने पांडुरंगाकडे काही मागावे हे त्यांच्या मनाला पटत नसे. कणकाईला जर पंढरपूरला नेले तर ती पांडुरंगाकडे पुत्रप्राप्तीसाठी हट्ट करेल म्हणून ते तिला पंढरपूरला नेत नव्हते. अशी अकरा वर्षे निघून गेली. बाराव्या वर्षी जेव्हा ते पंढरपूरला जायला निघाले तेव्हा कणकाईने खूपच हट्ट धरला .तेव्हा नाइलाजाने ते सोबत न्यायला तयार झाले; परंतु एक अट घातली की पांडुरंगाचं फक्त दर्शन घ्यायचं, मागायचं

काहीही नाही. हे कबूल करून घेतल्यानंतरच सोबत नेले.

पंढरपुरात अनेक ठिकाणावरून भक्तजन मोठ्या संख्येने गोळा होऊ लागले. त्या गर्दीमध्ये दोघांची चुकामुक झाली. बोल्होबा एकटेच पांडुरंगाच्या समोर दर्शनाला गेले. तेव्हा पांडुरंगाने मान खाली घातली. माता रुक्मिणीने त्यांना विचारलं, एवढे सारे फक्त तुमच्या दर्शनाला आले आहेत मग तुम्ही मान खाली का घातली? तेव्हा पांडुरंग म्हणाले, माझा भक्त बोल्होबा याच्या भक्तीच्या कर्जाखाली मी दाबलो गेलेलो आहे. मी त्याचा देणेकरी आहे; परंतु तो माझ्याकडे काहीच मागत नाही. त्यामुळे मला काही देता येत नाही. म्हणून मी शरमिंदा झालेलो आहे. म्हणून माझी मान खाली आहे. बोल्होबा दर्शन करून मंदिराबाहेर पडले. तेवढ्यात कणकाई पांडुरंगाच्या दर्शनासाठी आत आली आणि ती पांडुरंगाचं साजरं रूप डोळे भरून न्याहाळत असताना पांडुरंगाने स्वतःहून विचारले, बोल, तुला काय पाहिजे? कणकाई गोंधळून गेली. पांडुरंगाकडे काही मागायचं नाही असं पतीला तिने वचन दिलं होतं; त्यामुळे काय करावे हे तिला कळेना. पण नंतर तिने विचार केला, की पांडुरंगाने स्वतःहून जर विचारले तरी मागायचं नाही, असं कुठं आपण वचन दिलंय! पांडुरंगाची इच्छा असेल तर मागून घ्यावं म्हणून तिने पोटी संतान प्राप्ती व्हावी अशी मागणी केली. पांडुरंगाने तुला पुत्र होईल असा आशीर्वाद दिला. मंदिराच्या बाहेर आल्यानंतर ही घटना तिने बोल्होबांना सांगितली. हे ऐकून त्यांना वाईट वाटले. ते तिला घेऊन पुन्हा मंदिरात गेले आणि पांडुरंगाला सांगितलं की तू जर पोटी संतान देणार असशील तर असा पुत्र दे जो तुझी अखंड सेवा भक्ती करणारा असेल. निष्काम भावनेने परोपकार करणारा असेल. आणि पुढे म्हटले की त्याचा तिन्ही लोकांमध्ये जयजयकार व्हावा.

पांडुरंगाच्या आशीर्वादाप्रमाणे कणकाईला पुत्र झाला. त्याचं नाव तुकाराम ठेवलं. तुकारामांची भक्ती, ईश्वरावरील प्रेम, निस्वार्थ भाव याविषयी सगळ्यांना माहीत आहे बोल्होबा काय किंवा सुदामाजी काय त्यांनी आपल्या निस्वार्थ भक्तीने ईश्वराला आपल्या ऋणात अडकवून ठेवले होते. कितीही दारिद्र्य आलं तरी सुदामाने श्रीकृष्णाकडे हात पुढे केला नाही. अशा भक्तांच्या दर्शनासाठी भगवंत तळमळत असतो. भक्ती ही अशीच निष्काम असावी.

❖❖❖

## संत समागम...
## फक्त शिकण्यासाठी

(पान ४४ वरुन)

बॅग आहे. तुम्ही जाल हो सहज! आमच्याकडे बघा. किती सामान आहे!" आणि खरंच स्टेशनपर्यंत पोचायला त्यांना खूप त्रास झाला. एवढंच काय, पण ट्रेनमधे चढताना त्यांना आणि इतर सहप्रवाशांनाही त्रास झाला. तेव्हा आठवली ती नाटिका "जिंदगी एक जंक्शन है" विचार करायला लावणारी ही बाब आहे. धन्य आहेत सदगुरु माताजी! आम्हाला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनाचं मोठं तत्वज्ञान शिकवत आहेत. जिथं जीवन जगण्याची कला शिकवली जाते तिथून ज्ञान गंगेची ती विचारधारा आणायची की वृथा भार वाहायचा?

म्हणूनच संत समागमाला आपण येतो ते फक्त आणि फक्त शिकण्यासाठी!

— बाळकृष्ण कासार
(रत्नागिरी)

# सामान्य ज्ञान



1. अमेरिका हा देश कोणत्या देशाचा गुलाम होता?
अ) जपान ब) रशिया क) जर्मनी ड ) इंग्लंड

2. या जगामध्ये एकूण किती देश आहेत?
अ) 190 ब) 195 क) 200 ड) 210

3. नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सर्वप्रथम 'नेताजी' असे कोणी संबोधले होते?
अ) महात्मा गांधी ब) भगतसिंह क) अडॉल्फ हिटलर ड ) मोहम्मद जिना

4. माणसाने सर्वप्रथम कोणता धातू उपयोगात आणला?
अ) लोखंड ब) तांबे क) चांदी ड) सोने

5. भारतातील सर्वात मोठे प्राणी संग्रहालय कोठे आहे?
अ) कोलकाता ब) बेंगळूरु क) मुंबई ड) कानपूर

6. विमानाच्या टायरमध्ये कोणता वायू भरतात ?
अ) हायड्रोजन ब)कार्बनडाय ऑक्साइड
क) ऑक्सीजन ड)नायट्रोजन



7. विजेच्या दिव्याचा (बल्ब) शोध कोणी लावला?
अ) न्यूटन ब) एडिसन
क) ग्रॅहम बेल ड )लुई पाश्चर

8. भारतातील सर्वात मोठे शहर कोणते?
अ) दिल्ली ब) कोलकाता क) मुंबई ड) हैदराबाद

9. खालीलपैकी कोणती व्यक्तीरेखा महाभारतातील नाही?
अ) शिखंडी ब) बृहन्नला क) कीचक ड) संपाती

10. सर्वोत्तम भक्त कोणाला म्हटले आहे?
अ) आर्त ब) अर्थार्थी क) जिज्ञासू ड) ज्ञानी

उत्तरे इतरत्र

# स्वामीजींचे देशप्रेम



अमेरिकेतील शिकागो धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांना अफाट प्रसिद्धी मिळाली. स्वामीजी आपल्या घरी यावेत, त्यांची सेवा घडावी त्यांच्याशी चर्चा करावी असे प्रत्येकालाच वाटू लागले. अनेकांनी त्यांना आमंत्रित केले.

अमेरिकेतील काही सुखवस्तू कुटुंबातही जाण्याचा योग आला; परंतु त्यांना भौतिक सुखाची लालसा नसल्याने तेथील सुख– सुविधा, ऐश्वर्य यात त्यांचं मन कधीच रमलं नाही. त्यांचं देशप्रेम आणि देशबांधवांविषयी असलेला कळवळा यामुळे कधीच ते ऐशोरामात राहिले नाहीत.

स्वामी विवेकानंदांचे गुरुबंधू स्वामी विज्ञानानंद यांनीही त्यांचे काही अनुभव लिहून ठेवले आहेत. एकदा स्वामीजींना अमेरिकेतील एका धनाढ्य व्यक्तीने आपल्या घरी आमंत्रित केले. त्यांचे उत्तम प्रकारे आदरातिथ्य केले. त्यांची उत्तम बडदास्त राखली. तेथील ऐश्वर्य, सुखविलास यात त्यांना गुदमरल्यासारखे वाटू लागले. स्वामीजींना रात्रभर झोप आली नाही. ते रात्रभर तळमळत होते. माझ्या मातृभूमीतील बांधव पारतंत्र्यात आहेत. दुःख आणि दारिद्र्यात खितपत पडले आहेत तेव्हा मला या सुख सुविधांनी युक्त अशा गाद्या गिरद्यांवर झोप लागणं कसं शक्य आहे? ते रात्रभर लहान मुलासारखे रडत परमेश्वराला प्रार्थना करत होते,"हे परमेश्वरा! माझे देश बांधव दुःख दारिद्र्यात आहेत आणि इथं अमेरिकन लोक भौतिक सुखासाठी वारेमाप पैसा उधळत आहेत. माझ्या देशाचा उद्धार कसा होणार? माझ्या देशबांधवांची सेवा मी कशाप्रकारे करु? तूच मार्ग दाखव."

बेलूर मठात घडलेला एक प्रसंग सांगताना स्वामी विज्ञानानंद म्हणतात, स्वामीजींच्या शेजारच्या खोलीमध्ये मी झोपलो होतो. मध्यरात्री अचानक मला स्वामीजींच्या खोलीतून हुंदक्यांचा आवाज ऐकू आला. जेव्हा मी उठून स्वामीजींच्या खोलीत आलो तेव्हा ते मला रडत असताना दिसले. मी त्यांना विचारलं, "स्वामीजी! तुमची तब्येत ठीक नाहीये का? त्यावर स्वामीजी सावरुन बसले. ते म्हणाले, "माझी तब्येत ठणठणीत आहे; पण माझा देश, माझे देशबांधव दुःख – यातना भोगत असताना मला शांत झोप कशी येणार? गुरुदेवांना हीच प्रार्थना करत होतो, की माझ्या देशबांधवांना चांगले दिवस येऊ दे. माझा देश स्वतंत्र होऊ दे"

स्वामीजींना देशाचा आणि देशवासीयांच्या कल्याणाचा ध्यास लागला होता.

संग्राहक : सुकदेव पाटील

# अनुभव आणि अनुमान

एक प्रवासी भर दुपारी रस्त्याने जात होता. उन्हामुळे घामाच्या धारा निथळत होत्या. त्याला खूप तहान लागली होती; परंतु आजूबाजूला सर्व घरं बंद होती. पाणी कुठे मिळेल या आशेने तो इकडे तिकडे बघत असताना त्याचं लक्ष सहज वर गेलं, तर एका घराच्या बाल्कनीत एक व्यक्ती उभी दिसली. प्रवाशाने खालूनच पाणी मिळेल का असे खुणेने विचारले. त्या व्यक्तीने मान हलवून हो म्हणत थांबा असे खुणवले. प्रवाशाला खूप समाधान वाटले; परंतु बराच वेळ झाला तरी ती व्यक्ती पाणी घेऊन आली नाही. प्रवासी मनातल्या मनात त्या व्यक्तीला दोष देऊ लागला; परंतु तेवढ्यात ती व्यक्ती बाटली आणि पेला घेऊन आली व म्हणाली, “माफ करा हं, उशीर झाला. म्हटलं पाण्याऐवजी लिंबू सरबतच घेऊन जावं म्हणून लिंबू सरबत घेऊन आलो” आता मात्र प्रवाशाने त्याला मनोमन खूप धन्यवाद दिले. नंतर त्याने सरबत पेल्यात ओतून एक घोट घेतला.. तर काय त्यात साखरच नव्हती. केवळ आंबट पाणी! तो घोट त्याच्या घशाखाली उतरेना. पुन्हा त्याने त्या व्यक्तीला दोष द्यायला सुरुवात केली. पाणी आणतो म्हणून मुळात एवढा उशीर केला आणि सरबत आणलं तेही बिना साखरेचं! काय मूर्ख माणूस आहे हा! तेवढ्यात त्या व्यक्तीने खिशातून साखरेची पुडी बाहेर काढली आणि म्हणाला, “माफ करा हं, मी मुद्दामच साखर घातली नाही; कारण तुम्हाला साखर चालते की नाही किंवा किती चमचे चालेल म्हणून मी पिठीसाखरच घेऊन आलोय.” क्षणभरापूर्वी दोष देणारा तो प्रवासी आता मात्र त्या व्यक्तीला खूप खूप धन्यवाद देऊ लागला. थोडक्यात काय, तर पूर्ण अनुभव घेतल्याशिवाय आपल्याला जे समोर दिसतं त्यावरून अनुमान लावू नये. चटकन कोणाच्याही बाबतीत मत प्रदर्शित करुन चांगले किंवा वाईट बोलू नये.

❖❖❖



# रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१. ड
२. ब
३. क
४. ब
५. अ
६. ड
७. ब
८. क
९. ड
१०. ड

## शब्दकोडे २९४

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ते | रे | २ सा | | ३ आ | ४ सा | म |
| वी | | ५ य | श | | सू | |
| ६ स | ७ चि | न | | ८ ओ | | ९ क |
| | ख | | १० का | ठ | ११ मां | डू |
| १२ डॉ | ल | र | | | ड | |
| | द | | १३ पं | च | वी | १४ स |
| १५ ज | रा | सं | ध | | | व्वी |
| ना | | | १६ रा | म | दा | स |

।। तू ही निरंकार ।।

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी । पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी । पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी । पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। गुरू की जैं जैं जो करता हैं उसकी होती जैं जैं कार।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा। गुरू की पूजा जो करता हैं उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


॥ तुही निरंकार ॥



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
अंचित रा. पाटील
राकेश ज. पाटील
कुशल रा. पाटील